## प्रेस नोट

जा.क्र. ६८४ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय,भंडारा
दिनांक:- २४.११.२०१७

# " अवैध दारूविक्री करणाऱ्याला तिन महिणे कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पो.स्टे. तुमसर अंतर्गत ग्राम मिटेवानी येथील बसस्थानक जवळ दिनेश अमृत सिंधीघनसुर, वय ३५ वर्ष, रा. मिटेवानी हा अवैधरित्या मोहाफुलची हात भट्टी दारूविक्री करीत आहे याबाबतची माहिती गावातील ग्राम सुरक्षा दलातील व महिला दारूबंदी समिती ग्राम मिटेवानी यांचे कडुन फोन द्वारे पो.स्टे. तुमसर येथे मिळाली त्यावरून कर्तव्यावर हजर असलेले स.फौ. हरीभाऊ ईश्वरकर, ब.नं.४९२, पो.ना. लिल्हारे यांचे सह ग्राम मिटेवानी येथे पोहचुन दारूविक्री करणारा आरोपी नामे दिनेश अमृत सिंधिघनसुर हा दारूविक्री करीत असलेल्या ठिकाणी ग्राम सुरक्षा दलाचे सचिन आनंदराव रहांगडाले व गावातीलच महिला १) सौ. करूणा दिलीप रंगारी, २) सौ. रिता किशोर मासुरकर यांचेसह छापा टाकला असता आरोपीची मोटार सायकल व आरोपीचे ताब्यात असलेली दारूने भरलेली प्लास्टीक डबकी मिळुन आल्याने सोबत असलेल्या महिला पंचा समक्ष घटणास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा करून आरोपी नामे दिनेश अमृत सिंधिघनसुर याचे विरूध्द पो.स्टे. तुमसर येथे अप.क्र. ६०२३/१६ कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस उपनिरिक्षक हरीभाऊ ईश्वरकर, ब.नं.४९२, पो.स्टे. यांनी केला त्यांना तपासात पो.ना. लिल्हारे, ब.नं.३२७, पो.ना. बडवाईक, ब.नं. ७०४ यांनी सहकार्य केले गुन्हयातील जप्त मालाचा नमुना रासायनिक प्रयोग शाळेतुन तपासुन घेतला व साक्षपुरावा गोळा करून आरोपी विरुध्द प्रथम वर्ग न्यायालय, तुमसर येथे आरोप पत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुणावणी **मा. प्रथम वर्ग न्यायाधिश श्री. यु. एन. पाटील सा**. यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. पाटणकर**, सहा. सरकारी अभियोक्ता प्रथम वर्ग न्यायालय, तुमसर यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. गुन्हयातील महिला पंचांनी योग्य साक्ष

दिली व बिनचुक तपासाचे आधारावर आज दि. २४.११.२०१७ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेुवन आरोपी विरूध्द दोषसिध्द झाल्याने कलम ६५(ई) महा.दारूबंदी कायदा अन्वये दोषी ठरवुन **तिन महिणे सश्रम कारावास व ३०००/-रुपये दंड, दंड न भरल्यास दोन महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली,** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, गजानन कंकाळे यांचे मार्गदर्शनात पोलीस शिपाई प्रकाश जाधव, १४२२ पो.स्टे. तुमसर यांनी पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

समाजात अवैध दारूविक्रीचा प्रश्न गंभिर असुन अनेक संसार उध्वस्त होत आहेत, विषारी दारूचे सेवणामुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. पोलीस दला तर्फे अवैध दारूविक्रीत्यांवर वारंवार कारवाया करण्यात येत असुन योग्य पंच व साक्षदार अभावी आरोपी निर्दोष सुटतात तरी गावातील प्रतीष्ठीत नागरीक, महिला, ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य व युवकांनी अवैध दारूविक्री समुळ नष्ठ करण्याकरीता निर्भयपणे पोलीसांना सहकार्य करावे असे अवाहन भंडारा पोलीस दला तर्फे करण्यात येत आहे.

(सुनिल व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी क्र. ९९८७३८५४०५

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.